# आठवणीतील नव निर्मितीचा काळ

## एक कल्पनेतील विश्व

**A PHOTO BOOK**




प्रवीण मिशाळ

# आठवणीतील नव निर्मितीचा काळ

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटं

१ मिनिट: लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट: ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा

१ मिनिट: आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल आणि ई साहित्याबद्दल सांगा

असे ना केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. वाह प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे काही नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# आठवणीतील नव निर्मितीचा काळ

प्रवीण मिशाळ

ई साहित्य प्रतिष्ठान


# आठवणीतील नव निर्मितीचा काळ

लेखक: प्रवीण मिशाळ

mishall.praveen@gmail.com

Address: 2170 Hassell Rd, Apt 308, Hoffman Estates, IL 60169, USA
Phone Number: +1 312 509 5376

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुर्नमुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



मी प्रवीण मिशाळ, मुंबईत लहानाचा मोठा झालो व नोकरीसाठी काही काळ पुण्यात वास्तव्यास होतो. सध्या अमेरिकेत शिकागो येथे वास्तव्यास आहे.

शिक्षण: B.E. आणि MBA (Finance)

छंद: छायाचित्रण, ओरिगामी, लिखाण आणि वाचन

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ जून २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## मनोगत

'असा तो, अशी ती', हे माझं पहिलं पुस्तक आणि तेसुद्धा ई साहित्यने प्रकाशित केलेलं. रसिकांनी त्या पुस्तकाला उदंड प्रतिसाद दिला. आणि अजून काहीतरी लिहिण्याचा हुरूप आला. 'असा तो, अशी ती'चा पुढील भाग लिहिण्याचा विचार होता पण काही वैयक्तिक कारणास्तव पुढील भाग लिहिणे जमलं नाही. पण लिहिण्याचा अजूनही विचार आहे.

दरम्यानच्या काळात Renaissance Faire ला तिसऱ्यांदा जाण्याचा योग आला. ही जत्रा किंवा उत्सव म्हणजे छायाचित्रकारांसाठी पर्वणीच असते. मग काय दर वर्षी इथे जाण्याचा प्रघातच पडला. छायाचित्रणाची आवड असलेल्या माझ्या मनात विचार आला की यावर का पुस्तक लिहू नये. आणि तिथूनच ह्या पुस्तकाची निर्मिती झाली. मनात थोडं कितु परंतु होतं की छायाचित्रणावरचं हे थोडं वेगळ्या धाटणीचं पुस्तक रसिकांच्या पसंतीस पडेल की नाही ते. आशा आहे की हे पुस्तकसुद्धा रसिकांच्या तेवढ्याच पसंतीस उतरेल जेवढं 'असा तो, अशी ती'.

असा तो अशी ती ( प्रेमकथा संग्रह) : प्रवीण मिशाळ

## प्रस्तावना

अगदी खरं सांगायचं तर मी हे पुस्तक लिहू की नको ह्या विचारात होतो. आतापर्यंत एवढी पुस्तकं अमेरिका वारीवर लिहिण्यात आली आहेत की मी म्हटलं आपण त्यात एक पुस्तकाची भर घालून काय साध्य करणार आहोत. पण नंतर विचार केला की आपण ज्याबद्दल लिहिणार आहोत ते खूप लोकांना माहीत नाही आणि खरं सांगायचं तर त्याचा अमेरिकेशी फारसा संबंधही नाही. फक्त ही जत्रा अमेरिकेत भरते एवढंच काय तो अमेरिकेचा संबंध. अर्थात मी इथल्या लोकांचं ही जत्रा भरवण्यासाठी घेतलेल्या कष्टांचं मोल कमी करू इच्छित नाही पण फक्त नमूद करू इच्छितो की इथे उभा करण्यात येणार काळ मात्र अमेरिकेतील नाही. तत्त्वोतत्वी ही खरी तर जत्राही नाही आणि जत्रेऐवजी त्याला काल भ्रमण म्हटलं तर वावगं ठरणार नाही. पण त्याबद्दल आपण सविस्तर ह्या पुस्तकात बोलूच.

एकदा पुस्तक लिहायचं म्हटल्यावर विचार केला की नुसतं Renaissance Faire बद्दल सांगून चालणार नाही. कारण ह्या कार्यक्रमाची खरी मजा तर तो बघण्यात आणि अनुभवण्यात आहे. आणि म्हणूनच हे पुस्तक किवा क्षणचित्रं पुस्तक लिहिण्याचा घाट घातला. अगदी ह्या कार्यक्रमाबद्दल कसे कळले ते गेल्या तीन वर्षात ह्या कार्यक्रमात काय अनुभवले आणि काय बदल झाले हे अथपासून इतिपर्यंत ह्या पुस्तकात तुम्हाला कळेल. हा माझा ह्या कार्यक्रमाबद्दलचा प्रवास आहे. गेल्या तीन वर्षात ह्या कार्यक्रमात जे काही पाहीलं आणि अनुभवलं ते माझ्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न. माहितीला चित्रांची जोड देऊन तुम्हाला ह्या कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचा माझा हेतू आहे. आता तो कितपत साध्य झाला हे आता तुम्हीच तुमच्या प्रतिक्रियेतून नक्की कळवा.

# अनुक्रमणिका


गप्पांच्या ओघात... 10

इतिहासात डोकावताना... 17

Renaissance उत्सवाचा इतिहास... 20

Bristol Renaissance Faire... 21

The Original Mud Show... 24

Bristol Rovers... 27

Chalk Artist... 32

Dirk & Guido: The Swordsmen… 33

Fantastikals... 34

The Jouster... 44

Manticore Consort... 59

Moonie the Magnif'cent... 60

Barely Balanced... 61

Miscellaneous Photos... 67

## गप्पांच्या ओघात...

ही गोष्ट सुरू होते तीन वर्षांपूर्वी जेव्हा मी, माझी बायको आणि आमचे शेजारी कट्ट्यावर गप्पा मारत बसलो होतो. फक्त भारतीयच नाहीत तर अमेरिकन लोकसुद्धा कट्ट्यावर गप्पा मारतात आणि ज्यांच्याशी आम्ही गप्पा मारत होतो ते जोडपं आहे एका सेवानिवृत्त आजी आजोबांचं सुंदर जोडपं. नेहमीप्रमाणे गप्पा चालू होत्या तेव्हढ्यात लिडाने विचारलं, 'तुम्ही Renaissance Faire ला जाणार आहात का?'.

मी विचारलं, 'Renaissance Faire? ते काय असतं?' कारण जत्रा म्हटलं की आमच्या डोळ्यासमोर आले आकाश पाळणे, छऱ्याच्या बंदुकीने फुगे फोडण्यासारखे किवा रिंग टाकून वस्तू जिकण्यासारखे खेळ, खाऊ पिऊ आणि खरेदी करायला बऱ्याचशा गोष्टी अगदी लहान मुलांसाठी लाकडी तलवारीपासून ते बायकांसाठी असलेल्या कानातल्या गळ्यातल्या आभूषणापर्यंत.

पण जे लिडाने सांगीतलं ते तर काहीतरी भलतंच होतं आणि अफ़लातुनसुद्धा. म्हणजे अमेरिकेत आपल्यासारख्या जत्रा नसतात असं नाही पण ही जत्रा काही निराळीच होती. त्यामुळे आपण त्याला जत्रा नको तर उत्सव म्हणूया. कारण जत्रा म्हटलं की माझ्या डोळ्यांसमोर अजूनही पाळणेच येतात आणि पाळण्याशिवाय जत्रेला काय मज्जा असं वाटतं.

असो तर हा उत्सव काही आमच्या जवळ नव्हता तर तो होता आमच्यापासून साधारण तास दीड तासाच्या अंतरावर. आणि तोसुद्धा शेजारच्या राज्यात. म्हणजे आम्ही राहतो Illinois ह्या राज्यात आणि उत्सव होता Wisconsin राज्यात. सर्वप्रथम ते ऐकताच आम्ही म्हटलं खरंच जायचं का? Will it be worth?' आणि परत हा उत्सवसुद्धा काही फुकट नाही. म्हणजे एव्हढ्या लांब जा, तिकिटाचे आणि पार्किंगचे पैसे भरा आणि उगीचच गेलो असं वाटलं तर? पण लिडा आणि लॅरी ठाम होते. तुम्ही यायलाच हवं. तुम्हाला नक्की मजा येईल. आता त्यांच्या ह्या प्रेमळ आग्रहाला अव्हेरणं आम्हाला काही शक्य झालं नाही. आणि एका दृष्टीने ते चांगलंच झालं म्हणायचं नाही तर आम्ही ह्या Renaissance Faire नावाच्या जादुई नगरीला मुकलो असतो.

जवळच्याच वॉलग्रीन्समधून आम्ही तिकिटं* काढली आणि सज्ज झालो. शेवटी तो दिवस उजाडला. आम्ही अंमळ लवकरच निघालो जेणेकरून वेळेत पोहोचू. GPS वर address टाकला आणि निघालो. तिथे पोहोचल्यावर मोकळ्या पटांगणावर पार्किंग करून आम्ही प्रवेशद्वाराकडे चालू लागलो. लिडाने आधीच सांगीतलं होतं की खूप चालण्याची तयारी ठेवून या आणि त्याची प्रचिती इथूनच यायला लागली. गाडी पार्क केल्यापासून प्रवेशद्वार साधारण अर्धा एक किलोमीटर अंतरावर होतं. आम्ही पोहोचलो आणि पुढील नजाऱ्याने आमचं स्वागत केलं.

* Renaissance Faire तिकिटाचे दर (२०१८)

प्रौढ - $२५.९५

लष्कर आणि सेवानिवृत्त - $२३.९५

मुले/ मुली (५ ते १२ वर्षे) - $११.५०

४ वर्षा खालील मुले/ मुली - विनामूल्य




Renaissance Faire चे प्रवेशद्वार


तो नजारा बघताच आमची स्वारी खुष झाली. प्रवेशद्वारापासूनच उत्साहाचं वातावरण होतं. सगळी माणसं उल्हसित दिसत होती आणि नवनिर्मितीकालीन पेहरावातील लोकं येणाऱ्यांचं स्वागत करत होते.





नवनिर्मितीकालीन पेहरावातील लोकं

आत गेल्यावर आम्हाला Renaissance Faire चा नकाशा मिळाला. आता हा नकाशा म्हणजे नवनिर्मितीकालीन काल्पनिक शहर Bristol.




Bristol या काल्पनिक शहराचा नकाशा

लिडा आणि लॅरीने आम्हाला सांगायला सुरवात केली की काय नक्की बघायला हवं आणि काय हुकलं तरी चालेल. आम्हाला मार्गदर्शन करून आणि पर त कुठे आणि कधी भेटायचे ते ठरवून आम्ही आपापले मार्गस्थ झालो.

आता मी जर का तुमची उत्सुकता वाढवली असेल तर खूप पुढे या काल भ्रमणात जाण्यापूर्वी आपण थोडं इतिहासात जाऊ या आणि समजून घेऊ की Renaissance म्हणजे नक्की आपण कुठल्या काळाबद्दल बोलत आहोत आणि ह्या कार्यक्रमाचा काय इतिहास आहे ते. जर तुम्हाला इतिहासात रस नसेल तर तुम्ही पुढील भाग वगळू शकता पण मी तुमच्या जागी असतो तर असं नसतं केलं. पण तुमची मर्जी.

## इतिहासात डोकावताना...

जसं मी म्हटलं की Renaissance Faire बद्दल अजून जाणून घेण्यापूर्वी नव निर्मितीच्या (Renaissance) काळाबद्दल थोडं जाणून घेऊ या म्हणजे तुम्ही जेव्हा पुढील पुस्तक वाचाल तेव्हा तुम्ही त्याचा जास्त आस्वाद घ्याल. तर नव निर्मितीचा काळ म्हणजे युरोपाच्या इतिहासातील साधारण १४व्या ते १६व्या शतकातील काळ. हा काळ म्हणजे मध्ययुगीन काळाची (Medieval period) विस्तारित आवृत्ती आणि ज्ञान प्रसाराच्या आधुनिक (Modern age) इतिहासाला जोडणारा दुआ. हा काळ सर्वप्रथम इटलीतील फ्लौऊंरेन्समधील टस्कन शहरात सुरू होऊन तुकड्या तुकड्यात वाढला आणि मग बहुदा सर्वत्र युरोपात पसरला, काही विद्वानांच्या मते इथूनच झाली आधुनिक युगाची सुरवात.

### Renaissance, नव निर्मितीचा काळ म्हणजे नक्की काय?

Renaissance हा फ्रेंच शब्द आणि त्याचा शब्दशः अर्थ आहे 'पुनर्जन्म'. ही संज्ञा युरोपाच्या इतिहासातील १४व्या ते १६व्या शतकातील झालेल्या बदलांना सूचित करण्यासाठी वापरली जाते. जेव्हा पारंपरिक कला आणि पौराणिक ग्रीक व रोमन बुद्धिजीवींचे पुनरुज्जीवन झाले. ह्या काळातील कला, स्थापत्य, साहित्य, विज्ञान आणि तत्त्वज्ञान पुरातन भूतकाळाची एवढी आठवण करून देणारे होते की जणू काही युरोपाने सरत्या मध्य युगात पुनर्जन्मच घेतला.

### नव निर्मितीचा काळ आणि त्याचे यूरोपिअन इतिहासातील महत्व

नव निर्मितीचा काळ युरोपियन इतिहासाच्या कालपटलावर पाहिल्यास आपल्याला त्याच्या अस्तित्व व प्रभावाची कल्पना येते. सर्व साधारणपणे युरोपाच्या इतिहासाची विभागणी तीन काळात करता येते. पौराणिक (Ancient Europe), मध्ययुगीन (Medieval period) आणि आधुनिक (Modern age).

बहुतेक इतिहासकारांच्या मते पाचव्या शतकातील रोमन साम्राज्याच्या पाडावाने पौराणिक युगाचा अंत व मध्य युगाची सुरवात झाली. सर्वानुमते १८व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि १९व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेल्या औद्योगिक क्रांतीने आधुनिक युगाची पहाट उगवली. नव निर्मिती आणि सुधारणा काळ मध्य युगाचा उत्तरार्ध आणि आधुनिक काळाचा पूर्वार्ध यातील संक्रमण अवस्था दर्शवतो.

**नव निर्मितीचा काळ**

युरोपातील नव निर्मितीचा काळ हा सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचा काळ होता. हा नावीन्य, कल्पना रंजन आणि सर्जनशीलता दर्शविणारा काळ होता. हा तो काळसुद्धा होता जेव्हा युरोपाच्या पौराणिक इतिहासाला उजाळा मिळाला आणि पुनरुद्रेक झाला. बहुतेक सांस्कृतिक चळवळींची प्रेरणा लोकांच्या पौराणिक समाजाच्या जसं की पौराणिक ग्रीक आणि रोमन समाजाच्या अनुकरणातून मिळाली.

नव निर्मितीचा काळ गतानुगतिक (Conformist) समाज व मध्ययुगीन संस्कृतीपासून दूर जाणारे संक्रमणसुद्धा दर्शवतो. गतानुगतिक समाज म्हणजे असा समाज जिथे कायदे कानू सक्तीने पाळले जातात. हाच तो काळ जेव्हा सक्तीचा पारंपरिक साचा मोडून नाविन्यपूर्ण कल्पनांचे बीज बोवले गेले आणि फळफळले. आणि हळू हळू ख्रिस्ती चर्चचा प्रभाव कमी झाला.

**नवनिर्मितीकालीन बदल**

नव निर्मिती काळात जाणवण्याजोगे बदल कला व स्थापत्य, साहित्य, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यात झाले. या काळात या शाखांमध्ये युरोपातील पौराणिक इतिहासावर प्रेरित नवीन कल आणि शैली निर्माण झाली.

कला क्षेत्राने या काळात प्रतिकवादापासून (symbolism) दूर जाऊन सत्याशी नाळ जोडली. या काळातील चित्रकारांनी काढलेली चित्रे ही जास्त जिवंत व बहुआयामी होती. नवनिर्मितीकालीन वैद्यकीय क्षेत्रातील रचनात्मक (Anatomical) ज्ञानात झालेली वृद्धी मानवी शरीराचे भाग जसेच्या तसे काढण्यात काही प्रमाणात कारणीभूत ठरली. बहुतेक ह्या मिळविलेल्या नवीन ज्ञानाचे श्रेय नवनिर्मितीकालीन अग्रगण्य व्यक्ती लिओनार्दो दा विची ( Renaissance man) यांना दिले जाते.

नवनिर्मितीकाळात साहित्यातही आमूलाग्र बदल झाले. साहित्यिक आणि कवी पौराणिक ग्रीक आणि रोमन काव्य आणि कथानके नव्याने पाहू लागले. मध्ययुगीन धर्म आणि तत्त्वज्ञान विषयक साहित्यापासून दूर जाऊन मानवी वैशिष्ठे आणि वर्तन हे विषय हाताळायला सुरवात झाली. १४४० मध्ये लागलेल्या छापखान्याच्या शोधाने तर माहिती सर्वसामान्यांना उपलब्ध झाली, ज्याचा शैक्षणिक क्षेत्रावर खूप मोठा परिणाम झाला.

तत्त्वज्ञानविषयक शैलीसुद्धा नवनिर्मितीकाळात बदलली. मानवतावादाने (humanism) मनुष्य आणि जगाबद्दल विचार करण्याची पद्धत बदलली. मध्ययुगीन काळात ख्रिस्ती चर्चचा मुख्यत्वे लोकांचे विचार आणि वर्तन ह्यावर प्रभाव होता. मानवतावादाने लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले आणि मनुष्य हा निसर्गतः पापी असतो ह्या मत प्रवाहापासून दूर नेले. अध्यात्मापासून दूर जाऊन लोकं शारीरिक गुणधर्मांचा विचार करू लागले.

विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्र यात नवनिर्मितीकाळात बरेच बदल झाले. शरीर शास्त्र, खगोलशास्त्र आणि भौतिकशास्त्र यात नवीन व रोमांचक शोध लागले. अभियांत्रिकी क्षेत्रात झालेल्या अभूतपूर्व शोधांनी येणाऱ्या काळातील दूर्बिण, घड्याळ आणि चष्म्यासारख्या शोधांची मुहूर्त वेढ ओढली. नव निर्मिती काळातील अग्रगण्य शास्त्रज्ञ म्हणजे गॅलिलिओ गॅलिलिए आणि लिओनार्दो दा विची.

आता नवनिर्मितीकाळाबद्दलची जुजबी माहिती घेतल्यानंतर आता आपण परत वळूया Renaissance Faire कडे. आणि जाणून घेऊ या Renaissance Faire च्या थोड्या इतिहासाबद्दल.

## Renaissance उत्सवाचा इतिहास…

Renaissance Faire हे अनेक गोष्टींचं मिश्रण आहे. थोडं हस्तकला उत्सव, थोडं इतिहासाचं पुनरुज्जीवन, तर थोडं कलादर्शन. या उत्सवात काम करणारे लोकं सहसा राणी एलिझाबेथच्या काळातील कपडे परिधान करतात. दुकानातून हस्तकला आणि खाऊ विकला जातो. गर्दीतून  मार्गक्रमण करत मिरवणूक जाते. विदूषक, जादूगार, संगीतकार आणि इतर मनोरंजन करणारे कलाकार आपल्या कलेचं प्रदर्शन करतात. तुमचा दिवस भटकण्यात, खरेदी करण्यात, विविध खाद्य पदार्थांचा आस्वाद घेण्यात, नाटक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम पाहण्यात आणि ब्रिटिश पेय प्राशन करण्यात जातो.

ह्या उत्सवाचा अनुभव शब्दात मांडणे थोडं कठीण आहे. आणि जे लोकं पहिल्यांदा ह्या उत्सवाचा अनुभव घेतात ते या गलबलाटात हरखून जातात. रस्त्यावरील फेरीवाले, वाऱ्यावर उडणाऱ्या विविध फिती आणि झेंडे, घंटा नाद, तंतू आणि वायुवाद्यांचा आवाज, अनोळखी उच्चारात गुणगुणलेली गाणी, खाद्यपदार्थांचा आणि फुलांचा सुगंध, चेहऱ्यावर सूर्य किरण पडताना होणार उनसावलीचा खेळ आणि वाऱ्यावर भिरभिरणारे केस. स्वत:च्या व्यक्तिरेखेत शिरलेले आणि तुमच्याशी त्या व्यक्तिरेखेतून बोलू पहाणारे कलाकार आणि वास्तु विक्रेते जे तुम्हाला तुम्ही पाहात असलेल्या वास्तुच्या इथे येण्या पर्यंतच्या प्रवासाची कहाणी सांगतील.

अमेरिकेतील प्रथम Renaissance उत्सव कॅलिफोर्निया येथे १९६३ साली झाला. इतिहास, कल्पकता, विविधरंगी कपडे मिरवण्याची आवड आणि मदिराप्राशन ह्यामुळे लवकरच ह्या उत्सवाचा प्रचार अमेरिकेत सर्वत्र झाला. मुख्यत्वे नवनिर्मितीकालीन तर काही मध्ययुगीन पण प्रत्येक उत्सवात समुद्री डाकू व चाचे, बुटके, पऱ्या, परग्रहावरील योध्ये या सर्वांसह तुम्हीसुद्धा घर केले.

सध्या अमेरिकेतील बऱ्याच राज्यात Renaissance उत्सव भरवण्यात येतो. बहुतांशी हा उत्सव इंग्लंडमधील एलीझाबेथ राणीच्या काळातील काल्पनिक गावाभोवती घुटमळतो. चला तर आपण परत जाऊ या आपल्या ब्रिस्टॉल या शहरात, तेथील गमती जमाती पाहायला.

## Bristol Renaissance Faire...

आता तुम्ही उत्सवाचा नकाशा तर पहिलाच. आता जरा नजर टाकूया ब्रिस्टॉल उत्सवाच्या वैशिष्ठ्यांकडे. हा उत्सव पसरला आहे ३० एकरांवर आणि येथील २० व्यासपीठं/रंगभूमी तुमचे मनोरंजन करण्यास सज्ज असतात. (म्हटलं होतं ना लिडा आणि लॅरीनं बरोबर सांगितलेलं की भरपूर चालण्याची तयारी ठेवून या म्हणून.) त्याखेरीज पूर्णतः सशस्त्र द्वंध्व, राणी आणि तीचं न्यायालय, अप्रतिम कला आणि हस्तकलेचे नमुने, स्वादिष्ट भोजन, उत्तम मदिरा, संगीत, नृत्य, सवाऱ्या व खेळ आणि दिवसभर तुमचे मनोरंजन करणारे कलाकार. हा उत्सव जुलैमध्ये सुरू होऊन ९ आठवड्यांचे शनिवार, रविवार व कामगार दिनाच्या सोमवारी चालतो. आणि फक्त या उत्सवात आपली कला दाखवण्यासाठी म्हणून देश-परदेशातून अनेक कलाकार येतात. आणि तसेच काही हौशी रसिकही.

एकदा तुम्ही प्रवेशद्वारातून आत शिरलात की तुम्ही पोहचता १५७४ साली आणि तेसुद्धा शहरातील रोमांचक उत्सवाच्या दिवशी. आणि उत्सवाचं निमित्त काय तर स्वत: राणी एलिझाबेथ ब्रिस्टॉल शहराला भेट देणार आहे. ही वेळ आहे खाणे पिणे आणि मज्जा करण्याची. मौजमजा हाच तर आजचा दिनक्रम.

गमतीचा भाग म्हणजे जरी हा काळ असला नव निर्मितीचा काळ, तरी हा उत्सव पाहायला येणारी लोकसुद्धा विविध पेहराव करून येतात आणि तेसुद्धा फक्त राणी एलिझाबेथच्या काळातील नव्हे तर अगदी हॅरी पॉटरच्या ग्रिफेंडोर गटातील पेहरावापर्यंत. आणि अर्थातच जिथे मनुष्यप्राणी तिथे वादविवाद ठरलेला त्यामुळे काही विद्वानांचं मत आहे की हा उत्सव फक्त इतिहासाच्या पुनरावृत्तीपर्यंतच मर्यादीत ठेवावा जेणेकरून नव्या पिढीला हा इतिहास जगता येईल आणि ह्या उत्साहाचे मुख्य प्रयोजन अबाधित राहील. असो तर असेच काही हौशी कलंदर.







उत्सवातील काही हौशी पर्यटक

# The Original Mud Show...



पुढील क्षणचित्रे त्या मजेची थोडी कल्पना देतील.

ह्या उत्सवात इतके खेळ चालू असतात की सर्वांची माहिती चित्रांसहित पुरवणं अशक्य आहे. त्यामुळे जे खेळ किवा कार्यक्रम आम्ही प्रत्यक्ष अनुभवले त्याबद्दल मी येथे माहिती पुरवत आहे. लिडा आणि लॅरीसोबत आम्ही ह्या चिखलाचा शो मात्र एकत्र पाहीला आहे तेसुद्धा त्यांच्याच आग्रहावरून.

## Sturdy Beggars Mud Show – The Mud Pit

जेव्हा सर्वप्रथम Sturdy Beggars नी खास मनोरंजनासाठी तयार केलेल्या पटांगणात उडी मारली असेल तेव्हा एक गोष्ट मात्र आहे की ती होती मध्य पश्चिमेतील सुपीक व स्वादिष्ट मातीत. तेव्हापासून ह्या ओरिजिनल मड शोने २२ Renaissance उत्सवात सर्वत्र अमेरिकेत उपस्थिती लावली आहे.

'सर्व जगच आमची रंगभूमी आहे, फक्त रंगभूमीवर पाणी टाकायची देरी' ह्या म्हणीप्रमाणे ह्या कार्यक्रमाने सर्वत्र हास्य पसरवलं आहे. खेळ एकदम सोपा. संपूर्ण दर्शकांची दोन भागात विभागणी करून दोन मुख्य पात्रे एकमेकांना आव्हान देतात. आणि पंच शेवटी ठरवतो की कोण जिकणार. मग दर्शकांच्या सहभागाने आणि त्यांच्या जल्लोषात शब्दश: हरणारा माती खातो. आता कोण हरतो आणि काय होतं शेवटी हे मात्र तुम्हाला स्वत:लाच पाहायला हवं पण तुम्हाला एकंदरीत येणाऱ्या मजेची कल्पना आली असावी.






## Bristol Rovers...



दूर देशाच्या त्यांच्या प्रवासातून नाच, गाणी आणि संगीत घेऊन भटक्या जमातीतील लोकं ब्रिस्टलमध्ये उत्सवाच्या दिवशी आली आहेत. त्यांना शोधण्याचा सोपा उपाय म्हणजे रस्ता झाडत जाणारा त्यांचा रंगीबेरंगी लहरणारा पायघोळ स्कर्ट. आणि तुमचे कानसुद्धा उघडे ठेवा बरं का, कारण तुम्ही जर भाग्यवान असाल तर ते तुमच्याबरोबर त्यांच्या भटकंतीच्या काळातील काही शहाणपणाच्या गोष्टीसुद्धा सांगतील. त्यांना तुम्हाला त्यांच्या अद्वितीय शैलीतील नाचाने आणि पारंपरिक पूर्वेकडील लोकसंगीताने संमोहित करू द्याच.





Not all those
who wander







## Chalk Artist...



तर ही आहे आमच्या ब्रिस्टॉलची Magdalena daVinci. अलौकिक प्रतिभावान आणि आत्मशिक्षित खडू कलाकार (तिच्या वयाचा विचार करता बाल कलाकार म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल). पाहायला विसरू नका तिने बनवलेली भव्य आकाराची चित्रे.

गेल्या तीन वर्षांपासून ही बाल कलाकार आपल्या चित्रांनी लोकांना अचंबित करत आहे.


# Dirk & Guido: The Swordsmen…




वीस वर्षांहून अधिक काळ डर्क आणि गुइडो हे दोघं तलवारबाज त्यांच्या तलवारीचा खणखणाट करत, शौर्याचे आणि मुलींना रिझविण्याचे काम करत आहेत.


जरी ही तलवारबाजी असली तरी यांचा हा कार्यक्रम जास्त विनोदाकडे झुकणारा आहे त्यामुळे तुम्ही जर खऱ्याखुऱ्या तलवारबाजीची अपेक्षा करून आला असाल तर मात्र तुमची निराशा होईल. आणि अशा वेळी तुम्ही ह्या कार्यक्रमाला डच्चू दिलेलाच बरा.

# Fantastikals...



फँटॅस्टिकल्स ह्या उत्सवात जादू, विस्मय आणि आश्चर्य आणून ब्रिस्टॉल शहराची शान वाढवतात. राणीची ब्रिस्टॉल शहराला दिलेली भेट संभ्रमित क्षेत्राच्या कक्षा ओलांडून फँटॅस्टिकलना घेऊन येते. त्यांची अनैसर्गिक शक्ती त्यांना शहराच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवते आणि जादुई जंगलाची अनुभूती तुम्हाला ब्रिस्टॉल शहरामध्ये करून देते. तुम्हाला त्यांना पाहण्यासाठी दैवी दृष्टी हवी आणि जर ती तुमच्याकडे असेल तर मात्र तुम्ही त्यांना पाहू आणि या मुक्या प्राण्यांशी बोलूही शकता. तेव्हा अंगावर काटा येणाऱ्या या अनुभवासाठी सिद्ध रहा.

आम्ही जेव्हा सर्वप्रथम ह्या उत्सवात सामील झालो तेव्हा फँटॅस्टिकल्स अस्तित्वात नव्हते. २०१६ पासून ब्रिस्टॉल Renaissance उत्सवात त्यांनी उपस्थिती लावण्यास सुरवात केली. पण त्यांच्या अनोख्या अदांनी आणि विविधरंगी पोशाखांनी त्यांना ह्या उत्सवाचे मुख्य आकर्षण बनवले आहे. माझ्यासारख्या छायाचित्रकारासाठी तर फँटॅस्टिकल्स म्हणजे पर्वणीच. कारण एक तर आधी सांगितल्याप्रमाणे ते सहज सहजी दिसत नाहीत. दिसले तरी बोलत नाहीत आणि लवकरच गायब होतात. थोडक्यात काय तर पक्ष्यांची छायाचित्रे घेताना ज्या अडचणी येतात त्या बहुदा सर्व फँटॅस्टिकल्सना लागू पडतात. आता तुम्हीच पहा की त्यांच्यामागे जाणं सार्थ आहे की नाही ते.







झाडांमध्ये लपलेला हा कलंदर तुम्हाला लवकर दिसत नाही आणि कधी तो तुमच्या मानेपाशी येऊन तुम्हाला दचकवेल याचा नेम नाही



घराच्या छपरावर बसलेल्या ह्या फँटॅस्टिकलला पाहायला तुम्हाला खरंच दिव्यदृष्टी हवी




















## The Jouster…


The Jouster हा आहे पारंपरिक घोड्यांच्या पाठीवर बसून दोन योध्यांमध्ये एकमेकांना घोड्यावरून पाडण्यासाठी भाल्याने खेळला जाणारा खेळ.



पूर्णपणे सशस्त्र होऊन योध्ये हा खेळ एकदम पारंपरिक प्रकारे खेळतात. खेळाचा निकाल आधीच ठरलेला नसतो. म्हणजे ही लुटुपुटुची लढाई नव्हे तर हे आहे खरे खुरे युद्ध, जिकण्याच्या उद्देशाने खेळले जाणारे. तेव्हा ह्या पारंपरिक खेळाचा आस्वाद घेण्यासाठी सज्ज व्हा.




तर ह्या खेळाची अजून काही रोमांचक क्षणचित्रे –



खेळाचे नियम समजावून सांगताना







युद्धात सहभागी होण्यासाठी जोशाने रणांगणात उतरणारा योद्धा







जेव्हा विजेता शेवटी तलवारबाजीने ठरतो







राणी जेव्हा विजेत्याला इनाम जाहीर करते



इनाम स्वीकारताना विजेता



# Manticore Consort...




ब्रिस्टलच्या गल्ल्यांमधून जाताना Manticore Consort सोबत संगीतमय क्षण घालवा आणि हर्डी गर्डीसारख्या जुन्या वाद्यांच्या जादुई स्वरांमध्ये स्वतःला विसरून जा.

## Moonie the Magnif'cent...




गेल्या २० वर्षांपासून हा मुनी एकही शब्द तोंडातून न काढता लोकांची मने रिझवीत आहे. ब्रिस्टलच्या ह्या मंचावरचा मुनी हा अनभिषिक्त सम्राट आहे. त्यामुळे हा शो तुम्ही चुकवून बिलकुल चालणार नाही. मुनीचा हा शो म्हणजे जोकर, दोरीवरून चालणे आणि विनोद यांचा अजोड मिलाप आहे तो तुम्हाला हसवून हसवून डोळ्यात पाणी आणतो.

## Barely Balanced...




ब्रिस्टलमधील सर्वात प्रिय अशा ह्या कसरतीचे खेळ करणाऱ्या व त्यात विनोदाची चपखल पेरणी करणाऱ्या तिकडीचा खेळ पाहण्यास विसरू नका. त्यांच्या ताकत व चपखल हालचालींनी ते तुम्हाला स्तब्ध करतील. आणि शेवटी होणार आगीचा खेळ म्हणजे तर त्यांचे कसब पणाला लावते. पण हा खेळ पाहिल्यावर घरी परत जाताना तुम्ही त्यांच्याबद्दल वाटेत बोलला नाहीत असा होणं शक्य नाही.











Dirk &




Dirk & Ga

Guido
rdsmen!

## Miscellaneous Photos...

जसं मी आधीच म्हटलं की ह्या उत्सवाची खरी मजा तर ती अनुभवण्यात आहे. हे काही मुख्य कार्यक्रम सोडले तर इतर अनेक कार्यक्रम इथे होत असतात. प्रत्येकाची माहिती पुरवणे काही शक्य नाही पण असेच ह्या उत्सवात फिरताना टिपलेले काही क्षण ह्या भागात तुमच्यासाठी. काही या उत्सवातील कलाकार तर काही नुसतेच हौशी कलाकार जे या उत्सवात भेट द्यायला येताना वेगवेगळे पेहराव करून येतात. जर हे सर्व क्षण पाहून तुम्हाला या उत्सवात सहभागी होण्याची इच्छा झाली तर ही संधी बिलकुल गमावू नका आणि एकंदरीतच हा पूर्ण प्रवास कॅमेरामध्ये कैद करण्याचा माझा प्रयत्नही कसा वाटला हे सांगण्यास विसरू नका. तूर्तास इथेच विराम घेतो आणि हा जर प्रयत्न तुम्हाला आवडला तर पुन्हा लवकरच भेटू.



ह्या उत्सवातील विविध कलाकार




राणीची परेड



आपल्या अदांनी सम्होहीत करणारी एक अदाकारा











ह्या उत्सवासाठी खास परदेशातून आलेली युवराज्ञी



राणी व तिचे न्यायालय















राणी आणि युवराज्ञी





पारंपारीक नृत्य सादर करताना कलाकार


WHERE FANTASY RULES
BRISTOL
RENAISSANCE FAIRE
Voted #1
Renaissance faire in the Nation

## ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूडमध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पूर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोन हजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाउनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फॉरवर्ड करतात. व्हाट्स अप, ई-मेल, अॅप, ब्लू टूथ, वेब साईट, पेन ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलीत. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगळा आता कोणी थांबवू शकत नाही.

या धुमधडक क्रांतीत सामील व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई-मेल पत्ते, व्हाट्स अप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फक्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहा हजार. तुमच्या व्हाट्स अप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टीव्ही पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजन्ट. तेच आमची ताकत. मराठी भाषेची ताकत जगाला दाखवू.